REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख ५ जानेवारी, १९३८ | अंक १

उत्तम प्रकारचा शक्तिवर्धक

## सुवर्ण–मालिनी वसंत

आठ रुपये तोळा ( मुद्दाम किंमत उतरविली आहे )

-- खास हिवाळ्याकरितां पौष्टिक 'च्यवनप्राश' --

त्रिभुवनकीर्ति-गंधकरसायन-सुवर्णभस्म-मौक्तिकभस्म-चंद्रप्रभा-हेमगर्भमात्रा-सुवर्णराजवंगेश्वर-रससिंदूरमात्रा–
हिंगाष्टकचूर्ण-स्वादिष्ट विरेचनचूर्ण-योगराज-गुग्गुळ–अशोकारिष्ट–जंब्वासव--विडंगारिष्ट
शिवाय भस्में, आसवें, अरिष्टें, मात्रा, गुटिका, अवलेह वगैरे. औषधी–सूचिपत्रक मागवा.
गेलीं १५ वर्षे लोकादरास पात्र झालेलीं आयुर्वेदीय औषधें तयार करणारा मोठा कारखाना

## आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

डेक्कन जिमखाना : : : : पुणें ४.

आयुर्वेद महाविद्यालय मंडळाच्या व्यवस्थेखालील ह्या कारखान्यांत होणारा सर्व नफा आयुर्वेद–शिक्षण व संशोधन ह्यांकडे खर्च केला जातो.

## उंसाची नवी लागवड सुरू झाली.

-कार्यक्रम- { डिसेंबर १९३७ मशिनरीचा दुसरा हप्ता / जानेवारी १९३८ मशिनरीचा तिसरा हप्ता / फेब्रुवारी १९३८ मशिनरीचा शेवटचा हप्ता } मुंबईस येणार.

साखरेचे भाव वाढले त्या प्रमाणांत नफाही वाढणार.

शेअर आज घेऊन ठेवा; पुढें शेअरचे भाव वाढतील.

॥ विश्वासः फलदायकः ॥

सविस्तर माहिती व शेअर फॉर्म्स खालील पत्त्यावर मिळतील.

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें.

२५७ बुधवार पेठ, पुणें २.

# विविध माहिती

### हिंदी मँगेनीज [illegible]

१९३६ सालीं हिंदी मँगनीज [illegible] ५० लक्ष रुपये किंमतीचें ६½ लक्ष टन मँगेनीज [illegible] १ सालीं ४०½ लक्ष रुपयांचें ४½ लक्ष टन उत्पादन झालें [illegible]

### नाताळनिमित्त [illegible] टपाल

केसर-इ-हिंद आगबोटीनें [illegible] ता. ४ डिसेंबर रोजीं टपाल गेलें, त्यांत नाताळासाठी व नूतन वर्षानिमित्त पाठविण्यांत आलेल्या पत्रांच्या व बंग्यांचा भरणा मोटा होता. गेल्या वर्षापेक्षा यंदाचें वर्षी नाताळचें टपाल मोठें आहे, ह्यावरून आर्थिक परिस्थिति सुधारत असल्याचें अनुमान काढतां येण्याजोगें आहे.

### क्षयरोग निवारक फंड

लेडी लिनलिथगो ह्यांच्या क्षयरोग प्रतिबंधक फंडामध्यें सुमारें १० लक्ष रु. जमा झाले आहेत.

### औद्योगिक प्रगतीमुळें संपत्तीमध्यें वाढ

म्हैसूर संस्थानास, त्यांतील वीजगृहें, लोखंड-पोलादाचे कारखाने व इतर गिरण्या ह्यांपासून सालिना १ कोटि, ९० लक्ष रु. म्हणजे एकूण उत्पन्नाच्या एक तृतीयांशापेक्षा ज्यास्त उत्पन्न मिळतें. खर्च वजा जातां, या मार्गानें संस्थानास दरसाल निव्वळ ४८ लाखांची प्राप्ती होते.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ४ आ. व्याजाचा दर

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ४ आ. इतका पडला.

### हिंद-ब्रिटन कराराबाबतच्या वाटाघाटी

हिंद ब्रिटन व्यापारी कराराबाबतचीं तहकूब झालेलीं बोलणीं पुनः सुरू करण्याकरितां हिंदुस्थानातर्फे व्यापार मंत्रि, सर महमद जाफरुल्लाखान, हे विलायतेस जाणार आहेत.

### हिंदी तागावर ग्रेटब्रिटनमध्यें संरक्षक जकाती

हिंदी तागाच्या स्पर्धेचा ब्रिटिश कारखान्यांवर अनिष्ट परिणाम होतो, ह्यासाठीं कच्च्या हिंदी मालावर जबर जकाती बसवून ग्रेटब्रिटनमधील तागाच्या गिरण्यांस संरक्षण द्यावें, अशी चळवळ करण्यास तेथील व्यापारी मंडळींनीं प्रारंभ केला आहे.

### बँक ऑफ इंग्लंडजवळील सुवर्ण-संचय

३० सप्टेंबर, १९३७ रोजीं बँक ऑफ इंग्लंडचे कोठारांत सुमारें ११ अब्ज रुपये किंमतीचें सोनें होतें.

### संयुक्त प्रांतांतील हत्ती कमी होत चालले

संयुक्त प्रांतांतील जंगलांमधील हत्तींची संख्या घटत चालली असून, आतां तेथें फक्त १०० हत्ती शिल्लक आहेत.

### मोटारगाड्यांची आयात

१९३६-३७ सालीं एकूण १२९३९ मोटारींची हिंदुस्थानांत आयात झाली व त्यांची किंमत २ कोटि, ४३ लक्ष रु. भरली. नवीन गाड्या ज्यास्त आकर्षक असल्यानें जुन्या गाड्या बदलून नवीन घेण्याची प्रवृत्ति वाढत असल्याचें दिसून आलें. १२,९३९ गाड्यांपैकीं ६,३३७ ब्रिटिश बनावटीच्या होत्या, ३,८७० अमेरिकेंतून आल्या, १,२९० कॅनडानें पाठविल्या, ४२ गाड्या फ्रेंच होत्या व इटलीची निर्गत ३८२ गाड्या इतकी झाली. ब्रिटिश गाड्यांत इंग्लंडमध्यें बनविलेल्या फोर्ड गाड्यांचाहि समावेश होतो. जर्मन गाड्यांची आयात वाढत आहे.

### लष्करी खर्चांत वाढ

१९३७ सालीं जगांतील सर्व देशांत मिळून एकूण सुमारें ३१½ अब्ज रु. लष्करी खात्यांवर खर्चण्यांत आले. १९१३ सालांतील खर्चाचे मानानें हा खर्च तिप्पट आहे. १९३७ मध्यें एकट्या युरोपांतील देशांनीं ३१½ अब्जांपैकीं ६३½% रकम खर्च केली; १९३२ सालीं हें प्रमाण फक्त ३०% इतकेंच होतें. १९३२ सालीं ग्रेटब्रिटनच्या लष्करी खात्यानें ११४ कोटि रुपये खर्च केले; १९३७ सालीं हा खर्च ३४० कोटींवर गेला!

### सरकारी नोकरांच्या पगारांत कपात

मद्रास प्रांतांतील सरकारी नोकरांच्या पगारांत १ जानेवारी, १९३८ पासून कपात करण्यांत आली आहे. प्रांतिक सरकारच्या अधिकारांतील १,००० रुपयांपेक्षां ज्यास्त तनखा मिळणाऱ्या नोकरांच्या पगारांत ३० टक्के कपात होईल; त्या खालच्या दर्जाच्या नोकरांचे पगारहि योग्य प्रमाणांत कमी व्हावयाचे आहेत. सनदी नोकरांच्या पगारास हात लावण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस नाहीं.

### हिंदी साखरेच्या निर्गतीस बंदी

साखरेच्या निर्गतीसंबंधानें झालेल्या आंतरराष्ट्रीय करारांत हिंदी साखरेची निर्गत होण्यास प्रतिबंध केला असल्यानें त्या करारास हिंदुस्थान सरकारनें मान्यता देऊं नये असा अभिप्राय मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें स्पष्ट व्यक्त केला होता. असें असतांहि सरकारनें निर्गत बंदीची अंमलबजावणी करण्याचें ठरविलें असून त्याप्रमाणें जाहीर हुकूमहि काढला आहे.

### दारूच्या जाहिरातींस बंदी

मद्रास सरकारनें आपल्या प्रांतांत दारूच्या जाहिरातींस बंदी केली आहे. बाहेरून येणाऱ्या वर्तमानपत्रांस ही बंदी लागूं नाहीं.

### लांचलुचपतीस प्रतिबंध

लांचलुचपतीच्या प्रकारास आळा घालण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरितां संयुक्त प्रांताच्या सरकारनें एक कमिटी नेमली आहे.

### जपानची वाढती लोकसंख्या

जपानची लोकसंख्या ता. १ ऑक्टोबर, १९३७ रोजीं ७ कोटि, १३ लक्ष इतकी भरली. स्त्रियांपेक्षां पुरुष सुमारें १३ लक्ष ज्यास्त आहेत. शेकडा ३५·२ टक्के लोक शहरांत रहातात. एक लाखापेक्षा ज्यास्त वस्ती असलेलीं ३९ शहरें आहेत. टोकियोची लोकसंख्या ६२३ लक्ष आहे. ओसाका शहराचा नंबर दुसरा लागतो; त्या शहरांत ३२ लक्ष लोक रहातात. जपानच्या लोकसंख्येंत दरसाल सुमारें १० लक्षांची भर पडत आहे.

### साखर व गूळ ह्यांचा दरमाणशी खप

हिंदुस्थानांत साखर व गूळ ह्यांचा दरमाणशी खप किती होतो, हें खालील कोष्टकावरून ध्यानांत येईलः—

| | खप ( पौंड ) | | |
|---|---|---|---|
| वर्ष | साखर | गूळ | साखर व गूळ |
| १९३०-३१ | ७·८ | १४·४ | २२·२ |
| १९३२-३३ | ५·८ | २०·२ | २६·० |
| १९३४-३५ | ६·२ | २२·७ | २८·९ |
| १९३६-३७ | ७·० | २७·० | ३४ |

१९३४-३५ सालीं ३७ लक्ष टन गुळाचें उत्पादन झालें होतें १९३५-३६ मध्यें तें वाढून ४१ लक्ष टनांवर गेलें व १९३६-३७ मध्यें एकूण उत्पादन ४४½ लक्ष झालें. ह्यावरून गुळाच्या वाढत्या खपाची कल्पना येईल. उसाच्या पिकापैकीं शेकडा ७ इतक्या उसाचा विनियोग गूळ करण्याकडे होतो.

## अनुक्रमणिका


पृष्ठ

१ विविध माहिती २

२ चवथ्या वर्षांत पदार्पण ३

३ अखिल भारतीय आर्थिक परिषद् ... ४
शंभर वर्षांमागचा पत्रव्यवहार-हिंदुस्थानांतील बेकारी-बेकारीच्या विम्याची इष्टता व शक्यता-आर्थिक चलती-मंदीचें चक्र कसें थांबवतां येईल?

४ स्फुट-विचार ५
आर्थिक परिषदेच्या अध्यक्षांचें भाषण—आर्थिक व्यवस्थेची विस्कटलेली घडी—कपाशीचें रेल्वेभाडें उतरविण्यास सरकारचा नकार—मुंबई सरकारचें पाणी पुरवठ्याबाबतचें धोरण-चांदीचा भाव आणि अमेरिका

पृष्ठ

५ डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि. ... ७

६ मॅग्नीशिअम क्लोराइडच्या धंद्यास संरक्षण ७

७ सहकारी चळवळ ८

८ हिंदी लोकसंख्येचा प्रश्न ९

९ कर्तव्य हेंच जीवन आहे १०

१० " दाक्षिणी संस्कृति " १०

११ निवडक बाजारभाव ११


# अर्थ

बुधवार, ता. ५ जानेवारी, १९३८

## चवथ्या वर्षांत पदार्पण

" अर्था "च्या चवथ्या वर्षाचा पहिला अंक वाचकांस आज सादर करण्यांत आम्हांस आनंद होत आहे. व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, शेती, सहकार इत्यादि सर्वस्वी आर्थिक विषयांच्या विवेचनास वाहिलेलें, मातृभाषेंतील साप्ताहिक ह्या दृष्टीनें हिंदुस्थानांत " अर्था "स विशेष महत्त्व आहे आणि केवळ महाराष्ट्रासंबंधानेंच बोलावयाचें तर आमच्या समाजाच्या अभ्युदयाचा परिपोष करणारें तें अद्वितीय वाङ्मयीन साधन आहे असें आम्ही अभिमानानें म्हणतों. हिंदी राष्ट्र आर्थिक उन्नतीच्या बाबतींत इतकें मागासलेलें आहे कीं, अशीं अनेक इंग्रजी नियतकालिकें प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे. मराठीच्या ऐवजीं इंग्रजी भाषेचा आश्रय करून आम्हीं राष्ट्राच्या आर्थिक हितसंबंधांचें विवेचन साप्ताहिक केल्यास त्याचा उपयोग देशभर अनेक लोकांस होईल अशा सूचना आमचेकडे वारंवार आल्या आहेत. तथापि, सध्याच्या लोकशाहीच्या काळांत आणि विशेषतः बहुजन समाजाच्या उन्नतीची तीव्र आवश्यकता भासत असतां मातृभाषेच्या द्वारेंच आर्थिक विषयांचें लोकशिक्षण देणें अगत्याचें आहे अशी आमची समजूत आहे. "अर्था"सारखें रुक्ष साप्ताहिक लोकप्रिय होणार नाहीं, त्याचे वाचक हजारांनीं मोजतां यावयाचे नाहींत आणि तें चालविण्यांत अर्थप्राप्ति तर नाहींच पण तोटा हटकून येणार ह्याची जाणीव आम्हांस प्रारंभापासूनच आहे. परंतु कोणत्याहि समाजोपयोगी पण नव्या प्रकारच्या कार्याची अशीच परिस्थिति प्रारंभीं असणार हें समजून उमजूनच आम्हीं ह्या साहसास हात घातला. वाचकांच्या संख्येच्या दृष्टीनें अजूनहि आमचें कार्य यशस्वी झालें आहे असें आम्हांस म्हणतां येत नाहीं. तरीहि, ज्यांच्या अभिप्रायास विशेष किंमत आहे अशा अनेक मित्रांकडून "अर्था"चें अभिनंदन केलें जात आहे ह्यांत आम्हांस समाधानास जागा दिसत आहे. त्याचप्रमाणें, शिक्षणसंस्था, पतपेढ्या, बँका, व्यापारी मंडळ्या ह्यांचा आम्हांस मिळणारा वाढता आश्रयहि उत्तेजनकारक आहे. समाजाच्या आचारविचारांस व्यावहारिक वळण लावणें हा " अर्था "चा मुख्य उद्देश असल्यानें चाललेली प्रगति समाधानकारकच समजली पाहिजे.

हिंदी शिक्षणपद्धति सदोष असून समाजाच्या पोटापाण्याची व्यवस्था नीट होण्यास तिचें सहाय मिळत नाहीं, ह्या तक्रारीस अलीकडे विशेष जोर लागला आहे, हें सुचिन्ह आहे. त्याचप्रमाणें, व्यापार व उद्योगधंदे ह्यांचेकडे महाराष्ट्रीयांची प्रवृत्ति अधिकाधिक झुकत आहे ही गोष्टहि आनंददायक आहे. परंतु सुशिक्षित वर्गांत आणि धंदेवाल्यांत औद्योगिक व व्यापारविषयक प्रगतीचें रहस्य समजून घेण्याची आणि तरुणपिढीस त्याविषयींची गोडी लावण्याची इच्छा अजून फारशी दिसून येत नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें. अर्थविषयक वाङ्मय आपल्या मुला–मुलींच्या व तरुण पिढीच्या हातीं पडण्याचें महत्त्व लोकांस कळलें तरी वळत नाहीं. मुलगे शिकून तयार झाले म्हणजे " पुढें काय ? " हा प्रश्न त्यांचे वडिलांचे पुढें उभा रहातो. पण तहान लागली म्हणजे विहीर खणावयास लागण्याचा कांहीं उपयोग नाहीं, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. जुनी संस्कृति, परंपरागत कल्पना व दैववाद ह्यांचा हा अनिष्ट परिणाम आहे. तो नाहींसा करण्याचा विधायक प्रयत्न झाल्यावांचून गत्यंतर नाहीं. उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांचा विस्तार आणि प्रगति यांचेवांचून महाराष्ट्रास तरणोपाय नाही आणि त्या दिशेनें नेटाचे व संघटित प्रयत्न झाले पाहिजेत. ह्या कार्यास सहाय देणें हा " अर्था " चा मुख्य हेतु आहे, आणि तो सफल करणें समजूतदार महाराष्ट्रीयांच्या हातीं आहे. आमच्या समाजकार्याचें महत्त्व जाणून सहाय करणाऱ्या मित्रांचे मनःपूर्वक आभार मानून आश्रयदात्यांची आणि वाचकांची संख्या उत्तरोत्तर वाढत जाईल अशी आम्ही आशा करतों. " तुमचें लिहिणें आम्हांस समजत नाहीं" किंवा "तुमच्या पत्राचा आम्हांस काय उपयोग ? " ही वृत्ति नाहींशी होऊन महाराष्ट्रीय जनता आर्थिक विषयांत अधिकाधिक लक्ष घालीत जाईल असा आम्हांस विश्वास वाटतो.

---

## सायकली व त्यांच्या टायर-ट्यूब्स ह्यांची आयात

१९३६-३७ मध्यें १ कोटि,१२ लक्ष रुपये किंमतीच्या सायकलींची व त्यासंबंधाच्या मालाची हिंदुस्थानांत आयात झाली. ७४ लक्ष रुपयांच्या एकूण १,६५,३९० सायकली आल्या त्यांपैकीं १,५१,७८४ ब्रिटिश बनावटीच्या होत्या. ह्या देशांत येणाऱ्या सायकलींच्या व्यापारांत ब्रिटिश कारखानदारांचें किती प्राबल्य आहे हें यावरून दिसून येतें. एका सायकलीची सरासरीनें ३५ रुपये किंमत भरली. जपाननें १२,२०८ सायकली पाठवल्या व जर्मनींतून फक्त ९७९ आल्या. सुट्या भागांचे बाबतींत मात्र जपान व जर्मनी देश ब्रिटनशीं स्पर्धा करूं शकतात. सायकलींच्या रबरी धावा ( टायर्स ) बहुशीं ब्रिटिशच होत्या, १९३६-३७ सालीं २३ लक्ष, १८ हजार रु. किंमतीच्या १८ लक्ष,१७ हजार धावा हिंदुस्थानांत आल्या. आयात ट्यूब्सची संख्या २४ लक्ष, २४ हजार भरली व त्यांची किंमत ११ लक्ष ५३ हजार रु. होती.

# विविध माहिती

### हिंदी मँगनीज [illegible]

१९३६ सालीं हिंदी मँगनीज [illegible] ५० लक्ष रुपये किंमतीचें ६½ लक्ष टन मँगनीज [illegible] [illegible] सालीं ४०½ लक्ष रुपयांचें ४½ लक्ष टन उत्पादन झालें [illegible]

### नाताळनिमित्त पत्रें [illegible] चें टपाल

केसर-इ-हिंद आगबोटीनें [illegible] ता. ४ डिसेंबर रोजीं टपाल गेलें, त्यांत नाताळासाठीं व नूतन वर्षनिमित्त पाठविण्यांत आलेल्या पत्रांच्या व बंग्यांचा भरणा मोठा होता. गेल्या वर्षापेक्षा यंदाचे वर्षी नाताळचें टपाल मोठें आहे, ह्यावरून आर्थिक परिस्थिति सुधारत असल्याचें अनुमान काढतां येण्याजोगें आहे.

### क्षयरोग निवारक फंड

लेडी लिनलिथगो ह्यांच्या क्षयरोग प्रतिबंधक फंडामध्यें सुमारें १० लक्ष रु. जमा झाले आहेत.

### औद्योगिक प्रगतीमुळें संपत्तीमध्यें वाढ

म्हैसूर संस्थानास, त्यांतील वीजगृहें, लोखंड-पोलादाचे कारखाने व इतर गिरण्या ह्यांपासून सालिना १ कोटि, ९० लक्ष रु. म्हणजे एकूण उत्पन्नाच्या एक तृतीयांशापेक्षा ज्यास्त उत्पन्न मिळतें. सर्व वजा जातां, या मार्गानें संस्थानास दरसाल निव्वळ ४८ लाखांची प्राप्ती होते.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ४ आ. व्याजाचा दर

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ४ आ. इतका पडला.

### हिंद-ब्रिटन कराराबाबतच्या वाटाघाटी

हिंद ब्रिटन व्यापारी कराराबाबतचीं तहकूब झालेलीं बोलणीं पुन: सुरू करण्याकरितां हिंदुस्थानातर्फे व्यापार मंत्रि, सर महमद जाफरुल्लाखान, हे विलायतेस जाणार आहेत.

### हिंदी तागावर ग्रेटब्रिटनमध्यें संरक्षक जकाती

हिंदी तागाच्या स्पर्धेचा ब्रिटिश कारखान्यांवर अनिष्ट परिणाम होतो, ह्यासाठीं कच्च्या हिंदी मालावर जबर जकाती बसवून ग्रेटब्रिटनमधील तागाच्या गिरण्यांस संरक्षण द्यावें, अशी चळवळ करण्यास तेथील व्यापारी मंडळींनीं प्रारंभ केला आहे.

### बँक ऑफ इंग्लंडजवळील सुवर्ण-संचय

३० सप्टेंबर, १९३७ रोजीं बँक ऑफ इंग्लंडचे कोठारांत सुमारें ११ अब्ज रुपये किंमतीचें सोनें होतें.

### संयुक्त प्रांतांतील हत्ती कमी होत चालले

संयुक्त प्रांतांतील जंगलांमधील हत्तींची संख्या घटत चालली असून, आतां तेथें फक्त १०० हत्ती शिल्लक आहेत.

### मोटारगाड्यांची आयात

१९३६-३७ सालीं एकूण १२९३९ मोटारींची हिंदुस्थानांत आयात झाली व त्यांची किंमत २ कोटि, ४३ लक्ष रु. भरली. नवीन गाड्या ज्यास्त आकर्षक असल्यानें जुन्या गाड्या बदलून नवीन घेण्याची प्रवृत्ति वाढत असल्याचें दिसून आलें. १२,९३९ गाड्यांपैकीं ६,३३७ ब्रिटिश बनावटीच्या होत्या, ३,८५० अमेरिकेंतून आल्या, १,२९० कॅनडानें पाठविल्या, ४२ गाड्या फ्रेंच होत्या व इटलीची निर्गत २८२ गाड्या इतकी झाली. ब्रिटिश गाड्यांत इंग्लंडमध्यें बनविलेल्या फोर्ड गाड्यांचाहि समावेश होतो. जर्मन गाड्यांची आयात वाढत आहे.

### लष्करी खर्चांत वाढ

१९३७ सालीं जगांतील सर्व देशांत मिळून एकूण सुमारें ३१½ अब्ज रु. लष्करी खात्यांवर खर्च झाले. १९१३ सालांतील खर्चाचे मानानें हा खर्च तिप्पट आहे. १९३७ मध्यें एकट्या युरोपांतील देशांनीं ३१½ अब्जांपैकीं २३½ रकम खर्च केली; १९३२ सालीं हें प्रमाण फक्त ३०% इतकेंच होतें. १९३२ सालीं ग्रेटब्रिटनच्या लष्करी खात्यानें ११४ कोटि रुपये खर्च केले; १९३७ सालीं हा खर्च ३४० कोटींवर गेला!

### सरकारी नोकरांच्या पगारांत कपात

मद्रास प्रांतांतील सरकारी नोकरांच्या पगारांत १ जानेवारी, १९३८ पासून कपात करण्यांत आली आहे. प्रांतिक सरकारच्या अधिकारांतील १,००० रुपयांपेक्षां ज्यास्त तनखा मिळणाऱ्या नोकरांच्या पगारांत ३० टक्के कपात हे इतरांच्या खालच्या दर्जाच्या नोकरांचे पगारहि योग्य प्रमाणांत कमी व्हावयाचे आहेत. सनदी नोकरांच्या पगारास हात लावण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस नाहीं.

### हिंदी साखरेच्या निर्गतीस बंदी

साखरेच्या निर्गतीसंबंधानें झालेल्या आंतरराष्ट्रीय करारांत हिंदी साखरेची निर्गत होण्यास प्रतिबंध केला असल्यानें त्या करारास हिंदुस्थान सरकारनें मान्यता देऊं नये असा अभिप्राय मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें स्पष्ट व्यक्त केला होता. असें असतांहि सरकारनें निर्गत बंदीची अंमलबजावणी करण्याचें ठरविलें असून त्याप्रमाणें जाहीर हुकूमहि काढला आहे.

### दारूच्या जाहिरातींस बंदी

मद्रास सरकारनें आपल्या प्रांतांत दारूच्या जाहिरातींस बंदी केली आहे. बाहेरून येणाऱ्या वर्तमानपत्रांस ही बंदी लागू नाहीं.

### लांचलुचपतीस प्रतिबंध

लांचलुचपतीच्या प्रकारास आळा घालण्यासाठीं उपाययोजना सुचविण्याकरितां संयुक्त प्रांताच्या सरकारनें एक कमिटी नेमली आहे.

### जपानची वाढती लोकसंख्या

जपानची लोकसंख्या ता. १ ऑक्टोबर, १९३७ रोजीं ७ कोटि, १३ लक्ष इतकी भरली. स्त्रियांपेक्षां पुरुष सुमारें १½ लक्ष ज्यास्त आहेत. शेकडा ३५·२ टक्के लोक शहरांत रहातात. एक लाखापेक्षा ज्यास्त वस्ती असलेलीं ३९ शहरें आहेत. टोकियोची लोकसंख्या ६२½ लक्ष आहे. ओसाका शहराचा नंबर दुसरा लागतो; त्या शहरांत ३२ लक्ष लोक रहातात. जपानच्या लोकसंख्येंत दरसाल सुमारें १० लक्षांची भर पडत आहे.

### साखर व गूळ ह्यांचा दरमाणशी खप

हिंदुस्थानांत साखर व गूळ ह्यांचा दरमाणशी खप किती होतो, हें खालील कोष्टकावरून ध्यानांत येईल:—

| | खप ( पौंड ) | | |
|---|---|---|---|
| वर्ष | साखर | गूळ | साखर व गूळ |
| १९३०-३१ | ७·८ | १४·४ | २२·२ |
| १९३२-३३ | ५·८ | २०·२ | २६·० |
| १९३४-३५ | ६·२ | २२·७ | २८·९ |
| १९३६-३७ | ७·० | २७·० | ३४ |

१९३४-३५ सालीं ३७ लक्ष टन गुळाचें उत्पादन झालें होतें; १९३५-३६ मध्यें तें वाढून ४१ लक्ष टनांवर गेलें व १९३६-३७ मध्यें एकूण उत्पादन ४४½ लक्ष झालें. ह्यावरून गुळाच्या वाढत्या खपाची कल्पना येईल. उसाच्या पिकापैकीं शेकडा ७० इतक्या उसाचा विनियोग गूळ करण्याकडे होतो.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | २ |
| २ चवथ्या वर्षांत पदार्पण | ३ |
| ३ अखिल भारतीय आर्थिक परिषद् ... | ४ |
| शंभर वर्षांमागचा पत्रव्यवहार-हिंदुस्थानांतील बेकारी-बेकारीच्या विम्याची इष्टता व शक्यता-आर्थिक चलनी-मंदीचें चक्र कसें थांबवतां येईल! | |
| ४ स्फुट-विचार | ५ |
| आर्थिक परिषदेच्या अध्यक्षांचें भाषण—आर्थिक व्यवस्थेची विस्कटलेली घडी—कपाशीचें रेल्वेभाडें उतरविण्यास सरकारचा नकार—मुंबई सरकारचें पाणी पुरवठ्याबाबतचें धोरण-चांदीचा भाव आणि अमेरिका | |
| ५ डॉन ऑफ इंडिया विमा कं. लि. ... | ७ |
| ६ मॅग्नीशिअम क्लोराइडच्या धंद्यास संरक्षण | ७ |
| ७ सहकारी चळवळ | ८ |
| ८ हिंदी लोकसंख्येचा प्रश्न | ९ |
| ९ कर्तव्य हेंच जीवन आहे | १० |
| १० " दाक्षिणी संस्कृति " | १० |
| ११ निवडक बाजारभाव | ११ |



# अर्थ

बुधवार, ता. ५ जानेवारी, १९३८


## चवथ्या वर्षांत पदार्पण

" अर्था "च्या चवथ्या वर्षाचा पहिला अंक वाचकांस आज सादर करण्यांत आम्हांस आनंद होत आहे. व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, शेती, सहकार इत्यादि सर्वस्वी आर्थिक विषयांच्या विवेचनास वाहिलेलें, मातृभाषेंतील साप्ताहिक ह्या दृष्टीनें हिंदुस्थानांत " अर्था "स विशेष महत्त्व आहे आणि केवळ महाराष्ट्रसंबंधानेंच बोलावयाचें तर आमच्या समाजाच्या अभ्युदयाचा परिपोष करणारें तें अद्वितीय वाङ्मयीन साधन आहे असें आम्ही अभिमानानें म्हणतों. हिंदी राष्ट्र आर्थिक उन्नतीच्या बाबतींत इतकें मागासलेलें आहे कीं, अशीं अनेक इंग्रजी नियतकालिकें प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे. मराठीच्या ऐवजीं इंग्रजी भाषेचा आश्रय करून आम्हीं राष्ट्राच्या आर्थिक हितसंबंधांचें विवेचन साप्ताहिक केल्यास त्याचा उपयोग देशभर अनेक लोकांस होईल अशा सूचना आमचेकडे वारंवार आल्या आहेत. तथापि, सध्याच्या लोकशाहीच्या काळांत आणि विशेषतः बहुजन समाजाच्या उन्नतीची तीव्र आवश्यकता भासत असतां मातृभाषेच्या द्वारेंच आर्थिक विषयांचें लोकशिक्षण देणें अगत्याचें आहे अशी आमची समजूत आहे. "अर्था"सारखें रुक्ष साप्ताहिक लोकप्रिय होणार नाहीं, त्याचे वाचक हजारांनीं मोजतां यावयाचे नाहींत आणि तें चालविण्यांत अर्थप्राप्ति तर नाहींच पण तोटा हटकून येणार ह्याची जाणीव आम्हांस प्रारंभापासूनच आहे. परंतु कोणत्याहि समाजोपयोगी पण नव्या प्रकारच्या कार्याची अशीच परिस्थिति प्रारंभीं असणार हें समजून उमजूनच आम्हीं ह्या साहसास हात घातला. वाचकांच्या संख्येच्या दृष्टीनें अजूनहि आमचें कार्य यशस्वी झालें आहे असें आम्हांस म्हणतां येत नाहीं. तरीहि, ज्यांच्या अभिप्रायास विशेष किंमत आहे अशा अनेक मित्रांकडून "अर्था"चें अभिनंदन केलें जात आहे ह्यांत आम्हांस समाधानास जागा दिसत आहे. त्याचप्रमाणें, शिक्षणसंस्था, पतपेढ्या, बँका, व्यापारी मंडळ्या ह्यांचा आम्हांस मिळणारा वाढता आश्रयहि उत्तेजनकारक आहे. समाजाच्या आचारविचारांस व्यावहारिक वळण लावणें हा " अर्था "चा मुख्य उद्देश असल्यानें चालले‍ली प्रगति समाधानकारकच समजली पाहिजे.

हिंदी शिक्षणपद्धति सदोष असून समाजाच्या पोटापाण्याची व्यवस्था नीट होण्यास तिचें सहाय मिळत नाहीं, ह्या तक्रारीस अलीकडे विशेष जोर लागला आहे, हें सुचिन्ह आहे. त्याचप्रमाणें, व्यापार व उद्योगधंदे ह्यांचेकडे महाराष्ट्रीयांची प्रवृत्ति अधिकाधिक झुकत आहे ही गोष्टहि आनंददायक आहे. परंतु सुशिक्षित वर्गांत आणि धंदेवाल्यांत औद्योगिक व व्यापारविषयक प्रगतीचें रहस्य समजून घेण्याची आणि तरुणपिढीस त्याविषयींची गोडी लावण्याची इच्छा अजून फारशी दिसून येत नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें. अर्थविषयक वाङ्मय आपल्या मुला–मुलींच्या व तरुण पिढीच्या हातीं पडण्याचें महत्त्व लोकांस कळलें तरी वळत नाहीं. मुलगे शिकून तयार झाले म्हणजे " पुढें काय ? " हा प्रश्न त्यांचे वडिलांचे पुढें उभा रहातो. पण तहान लागली म्हणजे विहीर खणावयास लागण्याचा कांहीं उपयोग नाहीं, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. जुनी संस्कृति, परंपरागत कल्पना व दैववाद ह्यांचा हा अनिष्ट परिणाम आहे. तो नाहींसा करण्याचा विधायक प्रयत्न झाल्यावांचून गत्यंतर नाहीं. उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांचा विस्तार आणि प्रगति यांचेवांचून महाराष्ट्रास तरणोपाय नाहीं आणि त्या दिशेनें नेटाचे व संघटित प्रयत्न झाले पाहिजेत. ह्या कार्यास सहाय देणें हा " अर्था " चा मुख्य हेतु आहे, आणि तो सफल करणें समजूतदार महाराष्ट्रीयांच्या हातीं आहे. आमच्या समाजकार्याचें महत्त्व जाणून सहाय करणाऱ्या मित्रांचे मनःपूर्वक आभार मानून आश्रयदात्यांची आणि वाचकांची संख्या उत्तरोत्तर वाढत जाईल अशी आम्ही आशा करतों. " तुमचें लिहिणें आम्हांस समजत नाहीं" किंवा "तुमच्या पत्राचा आम्हांस काय उपयोग ? " ही वृत्ति नाहींशी होऊन महाराष्ट्रीय जनता आर्थिक विषयांत अधिकाधिक लक्ष घालीत जाईल असा आम्हांस विश्वास वाटतो.

---

## सायकली व त्यांच्या टायर-ट्यूब्स ह्यांची आयात

१९३६-३७ मध्यें १ कोटि,१२ लक्ष रुपये किंमतीच्या सायकलींची व त्यासंबंधाच्या मालाची हिंदुस्थानांत आयात झाली. ७४ लक्ष रुपयांच्या एकूण १,६५,३९० सायकली आल्या त्यांपैकीं १,५१,७८४ ब्रिटिश बनावटीच्या होत्या. ह्या देशांत येणाऱ्या सायकलींच्या व्यापारांत ब्रिटिश कारखानदारीचें किती प्राबल्य आहे हें यावरून दिसून येतें. एका सायकलीची सरासरीनें ३५ रुपये किंमत भरली. जपाननें १२,२०८ सायकली पाठवल्या व जर्मनींतून फक्त ९७९ आल्या. सुट्या भागांचे बाबतींत मात्र जपान व जर्मनी देश ब्रिटनशीं स्पर्धा करूं शकतात. सायकलींच्या रबरी धावा ( टायर्स ) बहुंशीं ब्रिटिशच होत्या, १९३६-३७ सालीं २३ लक्ष, १८ हजार रु. किंमतीच्या १८ लक्ष,१७ हजार धावा हिंदुस्थानांत आल्या. आयात ट्यूब्सची संख्या २४ लक्ष, २४ हजार भरली व त्यांची किंमत ११ लक्ष ५३ हजार रु. होती.

---

## द. हैद्राबाद येथील अखिल भारतीय आर्थिक परिषद्

### निबंधांचा सारांश.

हिंदी आर्थशास्त्रज्ञांची २१ वी वार्षिक परिषद दक्षिण हैद्राबाद येथें गेल्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत मद्रास विश्वविद्यालयांतील अर्थशास्त्राचे प्रोफेसर, डॉ. पी. जे. टॉमस, ह्यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. परिषदेंत वाचण्यांत आलेल्या प्रमुख निबंधांचा गोषवारा येथें दिला आहे.

### पुण्यांतील पेढी व तिची मुंबई येथील शाखा

#### शंभर वर्षामागचा पत्रव्यवहार

( प्रो. वा. गो. काळे )

१८ व्या व १९ व्या शतकांत महाराष्ट्रांतील सराफी पेढ्यांचे व्यवहार कसे चालत असत, एकमेकांवर हुंड्या काढून त्यांची पैशाची देवघेव कशी होत असे, वेगवेगळया चलनांची परस्पर हुंडणावळ रोज कशी बदलत असे, हिशेब कसे ठेवले जात असत, नफातोटा-पत्रकें व ताळेबंद कसे तयार करण्यांत येत, शाखा व पेढीचें मुख्य ठिकाण ह्यांचे परस्पर संबंध कोणत्या प्रकारचे असत, शाखांच्या कारभारावर देखरेख कशी ठेवण्यांत येत असे, इत्यादि माहिती प्रो. वा. गो. काळे, ह्यांनीं आपल्या निबंधांत दिली आहे. 'दीक्षित-पटवर्धन' ह्या सुप्रसिद्ध सराफी घराण्याचे दप्तरांतील हिशेबाचे व पत्रव्यवहाराचे कागदांवरून ही माहिती त्यांनीं एकत्रित केली आहे. 'दीक्षित-पटवर्धन' ह्या पेढीची मुंबईस एक शाखा होती, तिच्या व्यवस्थापकाच्या पत्रव्यवहारानें देशी बँकिंगच्या पद्धतीवर बराच प्रकाश पाडला आहे. मुंबई शहरांत खरेदीचा अगर विक्रीचा व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांस रकमा कर्जाऊ देण्याचा किफायतशीर धंदा तेथील शाखा करीत असे. शाखेच्या खातेदारांचे हिशेब उपलब्ध आहेत. शाखेतर्फे "अडत्यां"स हिंदुस्थानांतील वेगवेगळ्या ठिकाणचे हुंडणावळींचे दर नियमितपणें पुरविण्यांत येत असत. कंपनीचा सुरती रुपया सर्व ठिकाणीं चालू नव्हता व स्थानिक रुपयाची किंमत वारंवार बदलत असे. खातेदार शाखेवर हुंड्या काढीत परंतु आपल्या खात्यावर पुरेशी बाकी राहील अशी खबरदारी घेत नसत, अशी शाखेच्या व्यवस्थापकाची तक्रार असे. "लहन्या" हुंड्यांचे द्वारा आपल्या खात्यावर रकमा जमा करण्याची सोय होती, परंतु बाहेरगांवचे अडत्ये तसेंहि करीत नाहींत व स्वतःवरहि हुंड्या काढूं देत नाहींत असा मुंबई शाखेस अनेकवार पेच पडलेला दिसतो. आवश्यक असलेल्या रकमेपेक्षा ज्यास्त रकम मुंबई शाखेनें हातीं ठेवली, म्हणजे पुणें येथील पेढीकडून विचारणा होई व मुंबई येथील व्यवस्थापकास तेथील अडचणी समजावून सांगाव्या लागत. जडजवाहिराचा विमा स्वीकारून त्यावर अडत मिळविण्याचा धंदाहि मुंबई शाखा करीत असे. ह्या शाखेच्या व्यवस्थापकाचें एक बोधप्रद पत्र प्रो. काळे ह्यांनीं उधृत केलें आहे, त्यावरून मुंबईच्या पेढीचा उपयोग बाहेरगांवचे "अडत्ये" कसा करीत ह्याची उत्कृष्ट माहिती मिळते. हुंडणावळीचे दर वारंवार बदलल्या कारणानें मुंबई दुकानाची तारांबळ कशी उडत असे आणि तेथें योग्य शिलका हातीं ठेवण्याची अडचण कशी उद्भवत असे हेंहि स्पष्टपणें निदर्शनास येतें. हैद्राबाद संस्थानांत सराफी हिशेबाचे जुने कागद मिळण्याचा पुष्कळ संभव आहे, ते उजेडांत आणण्याची खटपट व्हावी अशी सूचना प्रो. काळे ह्यांनीं निबंधांत केली आहे.

### हिंदुस्थानांतील बेकारी

( श्री. एम. पी. गांधी, चीफ कमर्शिअल मॅनेजर, रोहटस इंडस्ट्रीज लि. )

हिंदुस्थानांतील बेकारीविषयीं आतां मुळीच दुमत नाहीं. देशांत उद्योगधंद्यांची मोठ्या प्रमाणावर स्थापना करणें, हा बेकारी-निवारणाचा एकमेव उपाय आहे. मोठ्या कारखान्यांबरोबर मध्यम व लहान आकाराच्या धंद्यांचीहि स्थापना केली पाहिजे. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं ह्या बाबतींत नेटानें प्रयत्न केल्यास पांच दहा वर्षांचे अवधींतहि बरेंच कार्य होणें शक्य आहे. सध्याची वेळ नवीन धंद्यांच्या स्थापनेस विशेष अनुकूल आहे. हलक्या दरानें भांडवल मिळणें सध्या सोपें आहे, मात्र सरकारनें ह्या बाबत उदार धोरण ठेवलें पाहिजे. देशी धंद्यांचें संवर्धन करून हिंदुस्थानास स्वावलंबी करण्याचा त्यानें यत्न केला पाहिजे. एकट्या साखरेच्या धंद्यानेंच आज २½ हजार पदवीधरांस व १० हजार सुशिक्षितांस काम दिलें आहे; त्याचप्रमाणें २ लक्ष कामगार व २ कोटि शेतकरी ह्या धंद्यावर अवलंबून आहेत, ह्यावरून उद्योगधंद्यांच्या वृद्धीचें महत्त्व ध्यानांत येईल. "आपला कच्चा माल परदेशीं पाठविण्यांतच आपलें हित आहे; उद्योगधंद्यांच्या वाढीमुळें बेकारीचें मूळ नाहींसें होणार नाहीं," असें सरकारी अधिकारी कित्येक वेळां सांगतात, त्यांत अर्थ नाहीं. विद्यार्थ्यांच्या शिक्षणांत आवश्यक ती सुधारणा करून त्यांस उद्योगधंद्यांची व शेतीची आवड लावण्याची योजना प्रांतिक काँग्रेस प्रधान मंडळांपुढें आहे. ह्या योजनेमुळें बेकारी निवारणास बरेंच सहाय होईल ह्यांत संशय नाहीं.

### हिंदुस्थानांत बेकारीच्या विम्याची इष्टता व शक्यता

( प्रो. द. गो. कर्वे )

उद्योगधंद्यांच्या वाढीमुळें उद्भवलेल्या बेकारीचें निवारण करण्याची जबाबदारी थोडीफार तरी समाजावर पडते. सुशिक्षितांच्या बेकारीच्या प्रश्नाची चर्चा चालू आहे. परंतु केवळ शैक्षणिक दृष्टीनें त्याचा विचार करून उपयोग नाहीं. कांहीं उद्योगधंद्यांतील विशिष्ट मोसम चांगले असतात व कांहीं काळ निरुद्योगांत घालवावा लागतो त्याची तरतूद करतां आली तर ठीक, नाहींतर शेतकऱ्यांप्रमाणें कामकऱ्यांस उपाशीं दिवस काढण्याची पाळी येते. औद्योगिक केंद्रांतहि कामगारांची संख्या त्यांस असलेल्या मागणीपेक्षा मोठी असते. काम असेल तेथें शोधून गरजू मनुष्यास तें मिळवून देणाऱ्या संस्थांची उपयुक्तता मर्यादित स्वरुपाचीच रहाणार, परंतु त्यांच्या स्थापनेमुळें कामगारांस थोडें फार स्थैर्य लाभेल. उरलेल्यासाठी कामगार संघांमार्फत फंडाची योजना पाहिजे. ह्या फंडास गिरणीवाल्यांनींहि हातभार लावला म्हणजे मजूर संघांच्या वाढीस सहाय होईल. ह्यांतून ज्यांस मदत मिळूं शकणार नाहीं, अशा लोकांस धर्मादाय फंडांतून सहाय मिळण्याची तरतूद असावी. स्थानिक स्वराज्य संस्थांनीं ह्या फंडासाठी कर बसवावे व खुषीच्या देणग्याहि मिळवाव्या. यंत्रसामुग्रींतील सुधारणामुळें उपस्थित होणाऱ्या बेकारीचें निवारण करण्याची जबाबदारी कारखानदारांस नाकारतां येणार नाहीं व त्याकरितां त्यांनीं झीज सोसली पाहिजे. आर्थिक स्थित्यंतरें, औद्योगिक चढउतार, ह्यांमुळें घडून येणाऱ्या दुःस्थितीचें निवारण समाजानें केलें पाहिजे. दुष्काळाचे काळांत शेतकऱ्यांस मदतीची आवश्य-

कता असते, तिचाहि विचार झाला पाहिजे. कारखान्यांतील कामावर चरितार्थ चालवणाऱ्या कामगारांची संख्या हिंदुस्थानांत वाढत आहे व त्यांचेमध्यें बेकारीचें प्रमाणहि फार मोठें आहे. त्यांच्या बेकारीचे निवारणाप्रीत्यर्थ विम्याची योजना आखतां येण्यासारखी आहे. हिंदुस्थानांतील दारिद्र्याचें निमित्त पुढें करून दुःस्थिति निवारण्याचें कर्तव्य समाजास ह्यापुढें टाळतां येणार नाहीं.

### आर्थिक चलती-मंदीचें चक्र कसें थांबवतां येईल?

( प्रो. बी. मुकर्जी, लखनौ विश्वविद्यालय )

आर्थिक चलती-मंदीची गति चक्राकार कां आहे, ह्याचें संशोधन करण्यापेक्षा ती थांबविण्यास उपाय कोणते योजावेत, हा प्रश्न ज्यास्त महत्त्वाचा आहे. आगामी आर्थिक, व्यापारी व औद्योगिक परिस्थितीचा अंदाज बांधून, येणाऱ्या संकटास तोंड देणें शक्य झालें तरी तो उपाय खरा नव्हे. त्यानें मूळ नाहींसें होत नाहीं. वांया जाणाऱ्या उत्पादक शक्तीचें जतन करून व मंदीची आणि चलतीची तीव्रता कमी करून दुःस्थिति थोडी-फार कमी करतां येणें शक्य आहे. भांडवलाचें नियंत्रण करून व श्रीमंत आणि गरीब ह्यांतील भेद कमी व्हावा ह्यासाठी करांची योजना आखूनहि थोडाफार कार्यभाग होईल. लोकांची क्रयशक्ति वाढविण्यावर प्रो. कीन्स ह्यांचा भर आहे. किंमती उतरविल्यानें खप वाढेल; त्याचप्रमाणें, लोकांचे पगार व वेतन ह्यांत वाढ केल्यास मालाचा उठाव होण्यास मदत होईल हें खरें. परंतु त्यामुळें उत्पादनाची किंमत वाढून बाजारभावहि वाढतील, हें विसरून भागणार नाहीं. हप्तेबंदीनें मालाची विक्री करणें हाहि उपाय समाधानकारक नाहीं. कामाचे तास कमी केले म्हणजे ज्यास्ती लोकांस काम लागेल असें सांगण्यांत येतें. परदेशी मालावर जकात बसविण्याचा मार्गहि सुचविण्यांत येतो. परंतु एखाद्या देशास उपयोगी पडणारा हा इलाज जागतिक स्वरूपाच्या रोगास हटवणार नाहीं. चलनाचें नियंत्रण करावें ह्या उपायावर अर्थशास्त्रज्ञांनीं बराच भर दिलेला आढळेल. पैशाच्या संचयाचा आर्थिक परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम होतो, तो टाळण्यास पैसा साठवणें नुकसानकारक करावें, असें डॉ. कॅसलनीं सुचविलें आहे. डिस्कौंटच्या दरांतहि चढउतार करून भांडवलाचा पुरवठा नियंत्रित करतां येण्याजोगा आहे. सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांनीं आपलीं मोठीं कामें मंदीचे दिवसांसाठी राखून ठेवावीं म्हणजे चलतीची वरची कमान व मंदीची अधोगति ह्यांमधील मध्य साधण्यास सहाय होईल, अशीहि एक सूचना आहे.

### रेल्वेजच्या उत्पन्नांत तात्कालिक घट

गेल्या दोन-तीन आठवड्यांत हिंदी रेल्वेजना जें उत्पन्न झालें, तें १९३६ सालांतील तत्सम आठवड्यांतील उत्पन्नापेक्षा बरेंच कमी आहे. ( १ ) कपाशीचा उठाव वाढत्या बाजारभावाची वाट पहात आहे व ( २ ) कपाशीच्या वहातुकीचे दरांत उतार होईल. अशी व्यापाऱ्यांची अपेक्षा आहे, ह्या दोन कारणांमुळें ही घट झाली आहे, असें रेल्वे बोर्डानें उत्पन्नांतील घटीचें समर्थन केलें आहे. १ एप्रिल ते ३० नोव्हेंबर, १९३७ अखेर हिंदी रेल्वेजना ६० कोटि ६० लक्ष रु. उत्पन्न झालें; गतसालीं ह्याच मुदतींत ५६ कोटि, ८८ लक्ष रु. उत्पन्न झालें होतें.

## स्फुट विचार

### आर्थिक परिषदेच्या अध्यक्षांचें भाषण

अखिल भारतीय आर्थिक परिषदेचे अध्यक्ष, डॉ. टॉमस, ह्यांनीं दक्षिण हैद्राबाद येथील अधिवेशनाचे प्रसंगीं मुख्य भाषण केलें, त्यांत हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्या निवारणार्थ उपाय त्यांनीं सुचवला तो शेती व उद्योगधंदे ह्यांचा एकसमयावच्छेदेंकरून उत्कर्ष हा होता. आर्थिक मंदीमुळें हिंदी जनतेच्या शेतीविषयक व बिगर-शेतीच्या उत्पन्नांत घट झाली आहे; तथापि, एकंदरीनें पहातां, लोकांची मिळकत वाढवणें आणि तीहि औद्योगिक प्रगतीच्या मार्गानें वाढवणें ह्यांतच दरिद्री हिंदी जनतेचा तरणोपाय आहे. हिंदुस्थानांत संपत्तीचें उत्पादनच अत्यंत अल्प आहे आणि त्याचा बहुसंख्य लोकांच्या पदरीं पडणारा वांटा फार मर्यादित आहे असें म्हणून उत्पादन आणि वांटणी ह्या दोन्ही बाबतींत सुधारणा झाली पाहिजे, आणि असें होईल तर हिंदी दारिद्र्य व बेकारी ह्यांचेविषयींचा प्रश्न सुटेल असें डॉ. टॉमस ह्यांनीं सुचवलें. शेतीच्या धंद्याची व छोटेखानी धंद्यांची पद्धत, भांडवलाविषयींचे व्यवहार, शिक्षण-व्यवस्था इत्यादि सर्वच गोष्टींमध्यें कार्यक्षमतेचा अभाव असल्यानें हिंदुस्थानची आर्थिक स्थिति हलाखीची झाली आहे असें मत त्यांनीं प्रतिपादलें. मोठ्या आणि छोट्या, दोन्ही प्रकारांच्या धंद्यांची जोपासना झाल्यावांचून खेडेगांवीं व शहरीं बेकार लोकांस काम मिळणार नाहीं आणि जनतेची रहाणी सुधारणार नाहीं असा त्यांच्या प्रतिपादनाचा रोख होता.

### आर्थिक व्यवस्थेची विस्कटलेली घडी

आर्थिक सुधारणा घडून येण्यास सर्वांगीण प्रगति होणें अगत्याचें आहे. सरकारचे जिल्ह्याचे अधिकारी व निरनिराळ्या विधायक खात्यांतले नोकर ह्यांचें सहकार्य होऊन भौतिक उन्नतीची संघटित कामगिरी झाली पाहिजे असें डॉ. टॉमस यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थान देश अफाट असल्याकारणानें त्यांत मालाच्या खपास बाजार-पेठा विस्तृत आहेत. सध्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची घडी विस्कटलेली आहे आणि परराष्ट्रीय बाजार मर्यादित होणार आहेत. हिंदी जनतेची क्रयशक्ति वाढली असतां देशी कच्च्या—पक्क्या मालाचा उठाव होणें अवघड जाणार नाहीं. हिंदुस्थानांत लोकसंख्या झपाट्यानें वाढत आहे, त्यामुळें ह्या लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न दिवसानुदिवस अधिक बिकट होणार ह्याविषयीं अनेकांस काळजी वाटत आहे. परंतु बहुजनसमाजाची उत्पादनशक्ति वाढेल तर ही भीति निराधार ठरून लोकांची सामान्य रहाणी समाधानकारक होण्यास अडचण यावयाची नाहीं. हुंडणावळीच्या दरांत फेरबदल करून कार्यभाग व्हावयाचा नाहीं. तथापि, सरकारांनीं आर्थिक पुनर्घटनेच्या कार्यक्रमांत लक्ष घालणें अगत्याचें आहे. शेती, लहानमोठे धंदे आणि व्यापार ह्यांची विस्कटलेली घडी नीट बसवणें हें आजच्या मितीस अवघड पण महत्त्वाचें काम हिंदी लोकांचेपुढें आहे आणि तें पार पाडण्यास सर्वांनीं मनःपूर्वक झटलें पाहिजे. हा संदेश डॉ. टॉमस ह्यांच्या अध्यक्षीय भाषणानें दिला आहे.

### कपाशीचें रेल्वेभाडें उतरविण्यास सरकारचा नकार

कपाशीच्या जागतिक उत्पादनांत कमालीची वाढ झाली असल्यानें तिचा बाजारभाव पडला आहे. उत्पादनाचे मानानें तिची मागणी वाढलेली नाहीं. उलट, हिंदी कपाशीचें गिऱ्हाइक कमी

हाऊं लागलें आहे. जपान आपली परराष्ट्रीय देशीं मर्यादित करण्याच्या प्रयत्नांत आहे व ग्रेटब्रिटनमध्यें अमेरिकन कपाशीची आयात वाढूं लागली आहे. हिंदुस्थानांतील कपाशीच्या उत्पादकांस आपला माल आतां तोटा सोमूनहि विकावा लागणार व त्यामुळें शेतकऱ्यांच्या हलाखींत भर पडणार, हें स्पष्ट आहे. अशा प्रसंगीं सरकारनें त्यांच्या सहायास धांवणें अत्यंत आवश्यक आहे. सध्याचे रेल्वे-वहातुकीचे दर कपाशीस परवडत नाहींत; ते उतरविल्यास कपाशीचा सांठा उठूं शकेल, अशी सूचना हिंदुस्थान सरकारास करण्यांत आली होती, परंतु तिचा अव्हेर करण्यांत आला आहे. वहातुकीचे दरांत उतार करून, उद्योग-धंद्यांच्या व व्यापाराच्या चलती-मंदीवर ते अवलंबून ठेवणें तत्त्वतः इष्ट नाहीं; विशेषतः मंदीच्या काळांत आपलें उत्पन्न बुडविणें रेल्वेजना परवडणें अशक्य आहे, असें सरकारचें म्हणणें आहे. ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशन, ह्या कपाशीच्या धंद्यांतील प्रमुख व्यापारी संस्थेनें हिंदुस्थान सरकारास ह्याबाबत पत्र लिहून आपलें म्हणणें कळविलें होतें, त्यास उत्तर देतांना सरकारनें वरील मुद्दा पुढें मांडला आहे. महायुद्धापूर्वीच्या वहातुकीचे दरांचे मानानें सध्याचे दर विशेष ज्यास्त नाहींत, असें सरकारनें दाखवून दिलें आहे. हे दर आतां कमी केले, तर शेतकऱ्यांस फारसा फायदा होणार नाहीं; रेल्वेचें उत्पन्न मात्र १½ कोटींनीं कमी होऊन नीमायर योजनेप्रमाणें प्रांतांस मिळावयाच्या रकमांवरहि त्याचा अनिष्ट परिणाम होईल, अशी सरकारास भीति वाटत आहे. कपाशीच्या धंद्यास उचलून धरण्यासाठी रेल्वेजच्या उत्पन्नाचा बळी देणें इष्ट नाहीं व ह्या कारणानें वहातुकीचे दर कमी करतां येत नाहींत, असें सरकारनें स्पष्टपणें जाहीर केलें आहे. बहुसंख्य जनतेसाठी सरकारावर स्वार्थत्याग करण्याची पाळी आली, म्हणजे लोकांस मिळणारी मदत व सरकारचें होणारें आर्थिक नुकसान ह्यांचा मेळ बसणें नेहमीच कठीण जातें, असा अनुभव आहे. मिठावरील कराचे बाबतींत हाच मुद्दा नेहेमीं उपस्थित होत असतो. मिळत असलेलें उत्पन्न सोडून दिलें तर पुनः तें परत मिळविणें सरकारास कठीण जातें व अप्रियता सहन करावी लागते. परंतु शेतकऱ्यांनीं तरी दुसऱ्या कोणाचे तोंडाकडे बघावें? हा प्रश्न येथें उपस्थित होतोच. त्यांस सहाय करण्याची दुसरी एखादी योजना सरकारनें सुचवावयास हवी होती. त्यांनीं तसें केलें असतें तर त्यांची प्रस्तुतची विचारसरणी सयुक्तिक दिसली असती.

## मुंबई सरकारचें पाणीपुरवठ्याबाबतचें धोरण

मुंबई सरकारच्या, कालव्याच्या पाणीपुरवठ्याचे धोरणावर आज अनेक वर्षें टीका होत आली आहे. शेतीस पाणी पुरवितांना, शेतकऱ्यांस पाणीपट्टी डोईजड होतां कामा नये, परंतु त्याबरोबरंच सरकारास तूट सोसावी लागूं नये, असें धोरण सरकारास ठेवावें लागतें. मुंबई सरकारनें धरणें व कालवे ह्यांवर कोट्यवधि रुपये खर्चून, प्रांतांतील कांहीं दुष्काळी भागांत पाण्याची कायमची सोय करून दिली आहे. तथापि, हें पाणी घेऊन व त्यावर काढलेल्या पिकांतून पट्टी भरून शेतकऱ्यांस शेती किफायतशीर झाली नाहीं, तर पाणीपुरवठ्याचा उपयोग झाला, असें म्हणतां येणार नाहीं. साखरेच्या कारखान्यांसाठी मुद्दाम जागा राखून ठेवून उंसाच्या लागवडीस उत्तेजन दिलें, म्हणजे कालव्याच्या पाण्यास मागणी येऊन सरकारास उत्पन्न मिळेल, अशी कामत कमिटीनें कांहीं वर्षांपूर्वीं शिफारस केली होती. आतां महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं साखर-कारखाने स्थापन झाले आहेत व त्यामुळें कालव्यांचें पाणी खपूं लागलें आहे. गेल्या कांहीं वर्षांत शेतीच्या मालाचे बाजारभाव पडले असल्यानें कालव्याचें पाणी घेऊन पीक काढणें शेतकऱ्यांस परवडत नाहीं व पाणीपट्टी कमी करण्याविषयीं त्यांनीं सरकारास तगादा लावण्यास प्रारंभ केला आहे. केवळ पाणीपट्टी थोडी कमी केल्यानें शेतकऱ्यांची दुःस्थिति नाहींशी होईल, असें नाहीं; तथापि, त्यांस सध्याचे बिकट परिस्थितींतून वांचविण्याचा, अनेक मार्गांपैकीं तो एक मार्ग आहे. ह्या व्यापक प्रश्नाचा निकाल लावण्यापूर्वीं त्याची तपशीलवार चौकशी करण्यासाठी मुंबई सरकारनें एक प्रातिनिधिक कमिटी नेमली आहे. सर मोक्षगुंडम् विश्वेश्वर अय्या हे तिचे अध्यक्ष असून इरिगेशन खात्याचे कांहीं अनुभवी अधिकारी कमिटींवर आहेत. पुण्याचे श्री. आण्णासाहेब वर्तक व बारामतीचे श्री. रावसाहेब शेंबेकर ह्यांचीहि सभासदांचे यादींत नांवें आहेत. स्वतःची जमीन करणारे बागाइतदार, खंडानें पीक लावणारे शेतकरी, साखर कारखाने, म्युनिसिपालट्या, रेल्वेज, इत्यादींस पाणीपुरवठा कोणत्या तत्त्वावर करावा, त्याबाबतच्या नियमांत फेरफार कोणते करावे, कालव्याशेजारील भिजट जमिनींबाबत कोणतें धोरण ठेवावें, इत्यादि प्रश्नांचा विचार करून कमिटीनें आपला रिपोर्ट लिहावयाचा आहे. कालव्याच्या पाण्याचा प्रश्न महाराष्ट्राचे दृष्टीनें अत्यंत जिव्हाळ्याचा असल्यानें प्रस्तुत कमिटीच्या रिपोर्टीचें त्यास विशेष महत्त्व आहे. मुंबई सरकारनें कमिटीची नेमणूक करून, पाणीपट्टीच्या प्रश्नाकडे लक्ष पुरविलें, ह्याबद्दल तें अभिनंदनास पात्र आहे.

## चांदीचा भाव आणि अमेरिका

अमेरिकन सरकारच्या धोरणावर जगांतील बाजारांतला चांदीचा भाव अवलंबून राहिलेला आहे. कोणत्याहि मालाचें उत्पादन व पुरवठा ज्यामध्यें मोठ्या प्रमाणांत होत असतो त्या देशाची परिस्थिति व धोरण हीं त्या मालाच्या किंमतीच्या बाबतींत निर्णायक होत असतात. कापसाच्या बाजारभावासंबंधानें हा अनुभव नुकताच आलेला असून चांदीच्या जागतिक किंमतीची अवस्था तीच आहे. अमेरिकेमध्यें खाणींमधून पुष्कळ चांदी निघते त्या धंद्यास संरक्षण देण्याचे हेतूनें चांदीच्या किंमतीचें नियंत्रण करण्याचें धोरण अमेरिकन सरकारनें अंगिकारलें असून विशिष्ट दरानें चांदी विकत घेण्याची त्या सरकारची तयारी असते. त्या धोरणाचा परिणाम चांदीच्या जागतिक बाजारावर होऊन तिची किंमत निश्चित होते. लंडन आणि मुंबई येथील चांदी बाजार ह्या रितीनें अमेरिकन सरकारच्या धोरणावर अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे. अमेरिकन खाणींतून निघणाऱ्या चांदीची किंमत कमी केल्याचें तेथील सरकारानें नुकतेंच जाहीर केलें आहे. त्यामुळें चांदीच्या बाजारांत थोडी गडबड उडाली आहे. तथापि, बाहेरील चांदीच्या किंमतीविषयींचें धोरण अमेरिकन सरकारानें जाहीर केलेलें नाहीं. ह्या धोरणाचा विशेष परिणाम चांदीच्या जागतिक किंमतीवर होणार नाहीं असा अंदाज आहे.


पत्ता बदलेला

**मराठी केन्द्र**

ही

१ जानेवारी १९३८ पासून

२९२, सदाशिव पेठ, ट्रेनिंग कॉलेजजवळ गेली आहे.

## दि डॉन ऑफ इंडिया विमा कंपनी लि.

### सन १९३६-३७ सालचा अहवाल व ताळेबंद

या पुणें येथील आयुर्विमा संस्थेचा सन १९३६-३७ सालचा अहवाल व ताळेबंद आमचेकडे अवलोकनार्थ आला आहे. त्यावरून पहातां कंपनीची प्रगती चांगली दिसून येत आहे. कंपनीनें आजतागायत दहा लाख रुपयांचे वर काम मिळविलें आहे. अहवालाचे सालीं जवळ जवळ सवादोन लाखांचे कामाची नवीन भर पडली आहे. गेले सालीं आयुर्विमा निधी ५४½ हजार रुपये होता तो या सालीं ६४¾ हजारांवर गेला आहे. म्हणजे, विमा निधींत १० हजारांची भर पडली आहे. नवीन विमा कायद्याच्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेकडे जेवढी रकम भरण्याची तजवीज करणें जरूर आहे तेवढ्या रकमेची कंपनीचे चालक मंडळानें तरतूद केली आहे. मार्च ३१ सन १९३६ पर्यंत सरकारकडे जामिनकी ठेव म्हणून भरावी लागणारी रकम हिशोबानें रु. ४८,८६१-०-० होत आहे व ती सर्व रकम कंपनीनें भरली आहे. त्यानंतर चालू सालीं ४५०० रुपये किंमतीचे सरकारी रोखे आणखी भरले आहेत.

### मॅग्नीशियम क्लोराइडच्या धंद्यास संरक्षण

हिंदुस्थानांत मॅग्नीशियम क्लोराइडचे एकूण तीन कारखाने आहेत, त्यांत दरसाल ९ हजार टन इतकें उत्पादन होतें. १९३१ सालीं ह्या धंद्यास प्रथम संरक्षण देण्यांत आलें आणि १९३३ सालीं त्याबाबतची जकात वाढविण्यांत आली. मुंबई इलाख्यांत कच्छचे रणांत खाराघोडा व कुडा येथें मॅग्नीशियम सल्फेट तयार करण्यांत येतें. हिंदुस्थानांत त्याचा विनियोग कपास कापडाच्या गिरण्यांतून 'साइझिंग' साठी करण्यांत येतो. सुताच्या धाग्यास बळकटी येऊन तो मागावर तुटूं नये, ह्या करितां 'सायझिंग' च्या मिश्रणांतून तो नेण्यांत येतो. मुंबईपेक्षां अहमदाबाद येथील गिरण्यांत मॅग्नीशियम क्लोराइडचा खप मोठा आहे. महायुद्धाचे काळांत जर्मन माल येईनासा झाला, तेव्हां खाराघोडा येथें पायोनियर मॅग्नीशिया वर्क्सची स्थापना करण्यांत आली, व ह्या धंद्यांत कारखान्यानें पांच सहा वर्षांत कमालीचें यश मिळविलें; परंतु पुढें जर्मन स्पर्धेपुढें त्याचा टिकाव लागला नाहीं. टॅरिफ बोर्डानें १९२५ सालीं ह्या धंद्याविषयीं चौकशी केली होती व संरक्षण देऊन त्याची पुनः उभारणी होणार नाहीं असा आपला अभिप्राय त्यानें व्यक्त केला होता.

### बनावट नोटा

१९३६-३७ मध्यें एकूण १,२७१ बनावट चलनी नोटा वगवेगळ्या करन्सी ऑफिसांत आलेल्या आढळल्या. बनावट नोटांचे बाबतींत रंगून, कलकत्ता, मद्रास व मुंबई असा विभागांचा अनुक्रम लागतो. १,२७१ बनावट नोटांपैकीं १,१३५ नोटा १० रुपयांच्या, ४१ नोटा १०० रुपयांच्या, ८८ नोटा ५ रुपयांच्या, व ७ नोटा १ रुपयाच्या होत्या. ५०० व १,००० रुपये किंमतीच्या बनावट नोटा आढळल्या नाहींत. एकूण ४३ लोकांवर खटले भरण्यांत आले, त्यांपैकीं ४३ जणांस शिक्षा झाली.

### राणीच्या छापाचीं नाणीं

१८७७ ते १९०१ ह्या वर्षांचे दरम्यान पाडलेल्या नाण्यांवर व्हिक्टोरिया राणीचा मुखवटा आहे. हीं नाणीं चालू आहेत; परंतु तीं सरकारी तिजोरींत आलीं, म्हणजे वितळवून टाकण्यांत येतात. १९३६-३७ सालीं अशा रीतीनें २ कोटि, ६ लक्ष रुपयांचीं व्हिक्टोरिया छापाचीं चांदीचीं नाणीं वितळविण्यांत आलीं.


## औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.

( स्थापना-८ आक्टोबर १९३२ )
हेड ऑफिस-औंध ( सातारा )
शाखा-आटपाडी, कुंडल, गुणदाळ, किर्लोस्करवाडी स्टेशन व दिघंची.

चालू ठेवींवर शेंकडा दीड टका व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवींवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे-सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जे दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.
शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak
मॅनेजर.

## न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि. मुंबई

( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतोः—
(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसीमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.
"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
टिळक रोड, पुणें ( २ )

## नागपूर प्रीमिअर को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, लिमिटेड.

टिळक पुतळ्याजवळ, नागपूर सिटी.

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००० |
| जमा असलेलें भांडवल | ८५,८०० |
| रिझर्व्ह फंड | ४,८१२ |
| इतर फंड | १,४०३ |
| मुदतबंद ठेवी | १,९८,५८६ |
| सेव्हिंग्ज बँक ठेवी | ९,०८३ |
| मेंबरांकडून येणें असलेलें कर्ज | २,७४,४३९ |
| सरकारी रोखे व तत्समान रोख्यांत गुंतविलेली एकूण रकम | ४०,७७४ |

सोसायटी जास्त कमी मुदतीच्या ठेवी स्वीकारते. ठेवींची रकम पूर्ण सुरक्षित. शेअर्स विकत मिळतात. आतांपर्यंत डिव्हिडंड पांच टक्यांहून केव्हांही कमी दिलें गेलें नाहीं. सोसायटी आपल्या मेंबरांना त्यांच्या घरांचे तारणावर कर्ज देते.

सोसायटीसंबंधींच्या पूर्ण माहितीसाठी पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज.

# सहकारी चळवळ

### को. क्रे. सोसायटी दुधोंडी ( सं. सांगली )

या पतपेढीची वार्षिक साधारण सभा गुरुवार ता. ३०-१२-३७ रोजीं रात्रीं ९ वाजतां श्री. राव. कुलकर्णी, रजिस्ट्रार, को. सो. सांगली, यांचे अध्यक्षतेखालीं झाली. सभेस निमंत्रित मंडळी खेरीज सभासद वगैरे मिळून सुमारें १२५ लोक हजर होते. चेअरमन श्री. देशमुख यांनीं प्रास्ताविक भाषण करून, कै. बाबासाहेब देवधर यांच्या नेतृत्वाखालीं १९३५ सालीं झालेल्या संस्थेच्या रौप्यमहोत्सवप्रसंगीं, त्यांनीं केलेल्या सूचनांपैकीं कांहीं सूचनांचा विचार झाल्याचें सांगून या सभेपुढें यावयाच्या एक-दोन ठरावासंबंधीं खुलासा केला. सेक्रेटरी यांनीं अहवाल व ताळेबंद समजावून दिल्यावर तो मंजूर झाला. नंतर निरनिराळे नऊ ठराव मांडण्यांत येऊन ते पास झाले. यांत संस्थेची स्थिति समाधानकारक असल्यानें कर्जावरील व्याजाचा दर द. म. द. रुपयास १½ पै ऐवजीं १¼ पै करण्याचा ठराव महत्त्वाचा आहे. शेवटीं अध्यक्षांचें "ग्रामोद्धार व सहकार्य" या विषयावर मननीय भाषण झालें. शेतकरीबंधूंच्या दृष्टीनें लग्नकार्यांत खर्च कमी करणें, तंटेबखेडे आपसांत मिटवणें, वृक्षारोपण करणें वगैरे गोष्टींवर त्यांनीं विशेष भर दिला, शेवटीं आभार प्रदर्शन झाल्यावर सभेचें काम संपलें.

### बॉंबे प्रॉ. को. बँक लि. ग्रुप कॉन्फरन्स

धी बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट, पूर्व खानदेश, शाखा जळगांव, याचे विद्यमानें मडगांव येथें मडगांव पाचोरा ग्रुप कॉन्फरन्स पूर्व खानदेश इन्स्टिटयूटचे विद्यमानें बोलावण्यांत आली होती. सदर सभेस मडगांव पाचोरा भागांतील सोसायट्यांचे प्रतिनिधी, सहकारी खात्यांतील अधिकारी, सेंट्रल को-ऑ. बँकेचे व्हाइस चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर, इतर अधिकारी, स्थानिक अधिकारी व इतर सभ्य मंडळी मिळून अंदाजें १,००० लोक हजर होते. सभेचे नियोजित अध्यक्ष, आमदार गंभीरराव चव्हाण, एम. एल. ए. हे स्थानापन्न झाल्यावर को-ऑ. इन्स्टिटयूटचे चेअरमन रा. कौतुकराव सयाजीराव पाटील यांनीं पाचोरा मडगांव भागांतील गेल्या तीन वर्षांतील सहकारी चळवळीच्या प्रगतीचा उल्लेख करून यापुढें आणखी जास्त प्रगती सहकारी तत्त्वावर कशी करतां येईल याचें मुद्देसूद वर्णन केलें. सहकारी तत्त्वावर सामुदायिक पद्धतीनें उत्तम शेती करणें, खरेदी विक्रीच्या पाचोरा येथील सोसायटीचा फायदा घेणें इत्यादि मार्गांनीं शेतकरी बांधवांची उन्नती कशी घडून येईल, ह्याचें त्यांनीं विवेचन केलें. त्यानंतर रा. बाळासाहेब टेंबूलकर, चेअरमन तालुका सुपरवायझिंग युनियन मडगांव यांनीं अध्यक्षांच्या निवडणुकीची सूचना मांडली.

अध्यक्षांनीं सहकारी चळवळीचें महत्त्व व त्यापासून शेतकरी बांधवांस आपली उन्नती कशी करून घेतां येईल, सहकारी चळवळीचा अयोग्य फायदा घेऊन कांहीं गुंड लोक संस्थांचा नाश कसा करतात, सभासदांनीं सोसायटीचे चेअरमन व पंच निवडतांना अगदीं निरपेक्षबुद्धीनें प्रामाणिक लोकांस निवडून कां द्यावें याबद्दल फारच मुद्देसूद माहिती सांगितली. पूर्व खानदेशांतील शेतकरी समाज बराच कर्जबाजारी झाला आहे. कर्ज निवारण्याचा विचार काँग्रेस सरकार करीत आहे परंतु त्याबरोबरच शेतकरी बंधूंनींही अंधानुकरण सोडून जुन्या परंपरेस फाटा दिला पाहिजे. लग्न व इतर कार्यांत जो अनाठायीं खर्च केला जातो त्यास चालू परिस्थितींत फाटा देणें किती आवश्यक आहे याबद्दल परिणामकारक असें त्यांनीं भाषण केलें. शेवटीं चालू हंगामांत पाचोरा सेल सोसायटीचा या भागांतील सर्व शेतकऱ्यांनीं फायदा घेऊन एकीचें महत्त्व व्यापारी वर्गास पटवून द्यावें याबद्दल विनंती करून आपलें भाषण संपविलें. अध्यक्षांचे भाषणानंतर सभेपुढें १७ ठराव एकंदर आले. सर्व ठराव पास झालेनंतर अध्यक्षांनीं जमलेल्या सर्व शेतकरी बांधवांस पुन्हां सदुपदेशाच्या दोन गोष्टी सांगून आपलें भाषण संपविलें.

### डेक्कन कॅनाल व नॉन कॅनाल परिषद, बारामती

शेतकऱ्यांच्या सध्याच्या विकट परिस्थितीचा विचार करून सर्व अडचणी दूर करून घेण्याकरितां ता. ६ जानेवारी १९३८, गुरुवार रोजीं दुपारीं १ वाजतां बारामती येथें ( श्री. बाळवे यांचे थिएटरांत ) श्री. केशवराव जेधे, एम्. एल. ए. यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर परिषद भरणार आहे.


**टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स**

[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात. ]

मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर,

**माधवाश्रम**

माधवाश्रम बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

हा आश्रम ट्रॅमच्या रस्त्यावर असून रेल्वे स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांवर आहे. जागा मध्यवस्तींत, हवाशीर व लागणारें फर्निचरनें शृंगारीत व व्यवस्थित खोल्या असून सरदार, श्रीमंत, विद्यार्थी, व्यापारी, वगैरे उच्च हिंदु लोकांस राहण्यास व भोजनाचे स्वच्छतेमुळें तसेंच इलेक्ट्रीक लाईट, पंखे ( फर्स्टक्लासमध्यें ) वगैरे सोयीमुळें जागा अत्यंत शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहाणारांची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.



## हिंदी लोकसंख्येचा प्रश्न

### प्रि. कर्वे यांचें व्याख्यान

गेल्या नाताळांत दक्षिण हैद्राबाद येथें हिंदी आर्थिक परिषद भरली होती, त्यावेळीं परिषदेच्या स्वागत कमिटीतर्फे झालेल्या प्रि. द. गो. कर्वे ह्यांच्या 'हिंदी लोकसंख्येचा प्रश्न' ह्या विषयावरील जाहीर व्याख्यानाचा सारांश:—

"१९२१ सालापासून १९३१ सालापर्यंत हिंदी लोकसंख्येंत शेकडा १० पेक्षा अधिक वाढ झाली. त्यापुढें जननाचे प्रमाणांत उतार न होता मृत्युसंख्येच्या प्रमाणांत मात्र उतार झालेला आहे. चालू दशकांत दुष्काळ अगर रोगराई ह्यांमुळें मोठ्या प्रमाणांत प्राणहानि होईल अशी भीति बाळगण्यास जागा नाहीं. ही परिस्थिति स्थूल मानानें पहातां असमाधानकारक आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण, एकंदरीनें संपत्तीच्या उत्पादनाचें प्रमाण लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणापेक्षा चढीचें आहे असें दिसतें. परंतु बहुजन समाजांत आर्थिक प्रगतिबद्दल आतुरता दिसत आहे ती फलद्रूप होण्यास व अल्पकाळांत हिंदुस्थानांतील दर माणशी उत्पन्नांत डोळ्यांत भरण्यासारखी मोठी वाढ होण्यास शेतकी, उद्योगधंदे, व्यापार इत्यादि धनोत्पादक साधनांमध्यें पद्धतशीरपणें जोराची सुधारणा करणें आवश्यक आहे. प्रांतिक व राष्ट्रीय सरकारांच्या नेतृत्वाखालीं औद्योगिक प्रगतीच्या मुदतशीर योजना करून त्या तात्काल अमलांत आणणें जरूर आहे. तसेंच, सध्या होत असलेल्या अगर पुढें होणाऱ्या औद्योगिक प्रगतीचा व्यक्तिशः नागरिकास अधिकांत अधिक फायदा करून घ्यावयाचा असेल तर लोकसंख्येच्या वाढीसंबंधांचें धोरणहि निश्चित केलें पाहिजे. ह्या बाबतींत विशिष्ट वैयक्तीय अगर इतर साधनांचा मुद्दा गौण असून व्यक्तिशः नागरिकानें व एकंदर समाजानें आर्थिक साधनांच्या वाढीस अनुसरून आपलें लोकसंख्या-विषयक धोरण ठरवावें, अगर लोकसंख्येकडे मुळींच लक्ष न देतां चालावें हा महत्त्वाचा प्रश्न आहे. सध्याच्या नियोजित व नियमित आर्थिक जीवनाच्या काळांत लोकसंख्येसारख्या महत्त्वाच्या अंगाकडे पूर्ण दुर्लक्ष करून चालणार नाहीं. उपलब्ध साधनांच्या व त्यांत होणाऱ्या वाढींच्या साहायानें आपली आर्थिक स्थिति अधिकांत अधिक मर्यादेपर्यंत सुधारण्यास किती लोकसंख्या असणें इष्ट आहे ह्याचा प्रत्येक व्यक्तीनें विचार करून चालणें आर्थिक प्रगतिच्या दृष्टीनें आवश्यक आहे. वैयक्तिक व सामुदायिक जीवनक्रमांत विवेकनिष्ठा व योजना-प्रधान वागणूक ह्यांचा प्रसार अधिक झाल्यास उद्योगधंद्यांची वाढ व लोकसंख्येचें नियमन हीं दोन्हीं ध्येयें साधण्यासारखीं आहेत."

प्रि. कर्वे ह्यांच्या व्याख्यानानंतर अध्यक्ष ह्या नात्यानें भाषण करतांना प्रो. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं सांगितलें कीं, आपल्याकडील जन्म-मृत्यूंच्या आकड्यांचा सध्यापेक्षा अधिक विचार होणें जरूर असून देशाच्या निरनिराळ्या आर्थिक विभागांत लोकसंख्येबद्दल कसकशी परिस्थिति आहे, ह्याचीहि स्वतंत्र चौकशी केली जाणें अगत्याचें आहे.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]


एच. एच. दि छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील
जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲन्ड कटिंग
जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू होणार. नांवें नोंदवा.
नवीन माहितीपत्रक मागवा. ४९७ बुधवार, पुणें.

लक्षांत ठेवा ] १९३७-३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा
कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार
"जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ"नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत."
श्री. आर. एन. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणें नं. २.
महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत. तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करा.

"अर्थ" ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
कि. १ रु. (ट. ख. निराळा)
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

## कर्तव्य हेंच जीवन आहे

### प्रो. काळे ह्यांचें हैद्राबाद येथील व्याख्यान

अखिल भारतीय आर्थिक परिषदेच्या हैद्राबाद येथील अधिवेशनाची संधी साधून तिच्या व्यवस्थापकांनीं प्रि. कर्वे, प्रो. काळे व डॉ. राव ह्यांचीं टाउन हॉलमध्यें नागरिकांसाठीं व्याख्यानें निश्चित केलीं होतीं. प्रि. कर्वे ह्यांच्या व्याख्यानाचा विषय "हिंदुस्थानांतील लोकसंख्या" हा होता. लोकसंख्या व संपत्तीचें उत्पादन ह्यांचा परस्पर संबंध कसा राहिला आहे हें आंकड्यांवरून सांगून जनतेची रहाणी सुधारण्यास व्यवस्थित प्रयत्न कसे झाले पाहिजेत ह्याचें त्यांनीं प्रतिपादन केलें. वैयक्तिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जीवन ह्यांचा परस्पर-संबंध कसा असला पाहिजे आणि राष्ट्रीय व सामुदायिक भावना प्रत्येक नागरिकाच्या वर्तनांत कशा प्रतिबिंबित झाल्या पाहिजेत ह्याचें प्रो. काळे ह्यांनीं आपल्या व्याख्यानांत विवेचन केलें. अर्थशास्त्राचे सिद्धांत व्यक्ती व राष्ट्र ह्यांच्या जीवनाचा ठाव घेणारे असणें आवश्यक असून व्यक्ति-स्वातंत्र्य, राष्ट्रीय आकांक्षा व गरजा ह्यांनीं नियमित होणें अपरिहार्य आहे. गेल्या पिढीचा जगाचा आर्थिक इतिहास पाहिला असतां त्यामध्यें सामुदायिक व राष्ट्रीय हिताकडे लक्ष आणि त्याची जोपासना करण्याची राज्यकर्त्यांनीं घेतलेली खबरदारी ह्यांचें प्राबल्य दिसून येतें. आपापली शेती, उद्योगधंदे व व्यापार ह्यांचें संरक्षण करणें व त्याकरितां नागरिकांस सहाय देणें हें राजकर्त्यांचें कर्तव्य समजण्यांत येत आहे. ह्याच दृष्टीनें हिंदुस्थानांतील सरकार व जनता ह्यांचें धोरण आखलें गेलें पाहिजे. जगांतल्या घडामोडींचा परिणाम आपल्या आर्थिक परिस्थितीवर कसा होत आहे ह्याचें निरिक्षण करून हिंदी राष्ट्रानें स्वतःच्या जीवनाचा मार्ग निश्चित केला पाहिजे. आपणांस जगावयाचें असेल तर हिंदी जनतेनें राष्ट्रीय भूमिकेवर संघटित यत्न करणें अगत्याचें आहे. जर्मनी, इटली, रशिया, अमेरिका इत्यादि राष्ट्रांच्या अलीकडच्या इतिहासाचें सिंहावलोकन करून हिंदुस्थाननें त्यापासून काय बोध घेतला पाहिजे ह्याचें मार्मिक दिग्दर्शन प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत केलें. "कालाच्या ओघाबरोबर वहावत जाणें हें जीवन नसून परिस्थितीचा अधिकांत अधिक फायदा करून घेण्याचा राष्ट्रीय व संघटित प्रयत्न करणें हें खरें जीवन आहे" हा त्यांच्या व्याख्यानाचा संदेश होता.

---

### "दक्षिणी संस्कृति"

निजाम सरकारच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष, सर अकबर हैदरी, ह्यांनीं आर्थिक परिषदेचें उद्घाटन केलें. दक्षिणी संस्कृतीमध्यें विविधता व एकत्व ह्यांचा मेळ बसलेला असून हिंदुस्थानांत ह्याच मार्गानें आपणांस पुढें गेलें पाहिजे असा उपोद्घात करून व्यावहारिक शिक्षण, सराफी व सावकारी धंद्याची जोपासना, सरकारी उत्पन्न-खर्चाची व्यवस्था, आर्थिक महत्वाच्या प्रश्नांविषयींची माहिती संकलित होण्याची तरतूद इत्यादि बाबींसंबंधानें हैद्राबाद संस्थानांत चाललेल्या प्रयत्नांचें थोडक्यांत वर्णन त्यांनीं केलें. शेतीच्या धंद्याची सुधारणा, कर्जनिवारण, जमिनींच्या तुकड्यांचें एकीकरण इत्यादि प्रश्न निजाम सरकारनें हातीं घेतले असल्याचें सर अकबर ह्यांनीं सांगितलें आणि आर्थिक परिषदेंतील चर्चेचा उपयोग आपल्या राज्यकारभारांत आपणांस होईल अशी आशा प्रकट केली.


जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते. भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे, कंत्राटदार**
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

"DAWN'S MENSORIUM" makes 6% addition to the monthly income of the family. Prospectus sent free on application.
*General Manager*, "The Dawn of India Life Insurance Company Limited, POONA."

**S. B. JOSHI & Co.**
**ENGINEERS & CONTRACTORS**
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

**स्त्रियांचा आजार**
म्हणजे मुख्यत: विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.
हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेते:—
**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** (डिपार्टमेंट नं. ६)
२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १२०–१० |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०४–१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८– ६ |
| ३½% चिनमुद्दत ... ... ... ... | ९८—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—४ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... ... | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४५—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | २९—८ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १५७५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १२५–१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—४ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९५८–१२ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्बे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११८–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४२०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४९४—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १६५–१० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४९—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... | २२—० |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ४ आ. | ४१–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४,४२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १६६—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २६६—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १,१७२—८ |

#### सोनें-चांदी-साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४–६¾ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ४८—८ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५—९ |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | ११–१२ |
| „ सरया प्रत्येक मणास ... ... | ११ –३ |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ भिवंडी ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ वाई ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ |

## खेळतें भांडवल रु. २०००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठीं कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २॥, किंवा प्रथम ६॥८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ महिने भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याची तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

**चा**लू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

**से**विंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

**मु**दतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

**क**र्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

**वन्देमातरम शिकाकाई साबू**

स्टॉकिस्ट : मा. गो. कुळकर्णी, किराणा मालाचे व्यापारी, पुष्करणी चौक, पुणें २

— मनपसंत काम —

वक्तशीर-पणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी

सदाशिव हौदानजिक, पुणें.

## गव्हाचे पोहे

(REGD.) ( BLOSSOM ) (REGD.)

कित्येकांना गहूं खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव, पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, कारखानदार.




पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें
अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.
सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

## भारतीय अर्थशास्त्र

लेखकः-प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये

प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथांत विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.